# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025


Original Article

# महात्मा गांधीजीचे हिंद स्वराज्य विषयक विचार


**प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील**

शंकरराव जगताप आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली ता. कोरेगाव जि. सातारा

**Email:** drvikrampatil77@gmail.com



**Manuscript ID:**

JRD -2025-171035

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 10

Pp. 168-170

October. 2025

**Submitted:** 19 Sept. 2025

**Revised:** 29 Sept. 2025

**Accepted:** 14 Oct. 2025

**Published:** 31 Oct. 2025



***सारांश***

*महात्मा गांधीजीनी हिंद स्वराज्य विषयक विचारातून प्रत्येक माणसाच्या स्वातंत्र्याच्या, स्वयंनिर्णयाच्या व आत्मबळाच्या आधारावर नवा समाज उभा करावयाचा आहे. असा समाज आपणास सत्याग्रहाच्या सहाय्याने उभा करता येईल. आपल्या स्वत:च्या अंत:करणामध्ये जे आत्मबळ आहे. त्याची जाणीव होईल केवळ इंग्रजाना हाकलून देऊन स्वराज्य मिळणार नाही. इंग्रज सेनापती जाऊन भारतीय सेनापती आला तर सत्ता या मुठभर लोकांच्याच हातात राहील त्या भारतीय स्वराज्याला अर्थ राहणार नाही. गांधीचा जो पर्यायी स्वराज्याचा मार्ग आहे तो प्रत्येक व्यक्तीच्या स्वायत्तेवर व लोकशाही अधिकारावर आधारलेला मार्ग आहे. या मार्गाचे प्रतिपादन अतिशय ठामपणे महात्मा गांधीनी केले आहे.*



***Keywords-*** *'हिंद स्वराज्य,'अहिंसा, आत्मबळ, सत्याग्रह, संस्कृती*


## प्रस्तावना

महात्मा गांधीनी 'हिंद स्वराज्य' हा ग्रंथ आफ्रिकेहून परत येत असताना लिहिला आहे. महात्मा गांधीनी हा ग्रंथ गुजराती भाषेत लिहिला आणि नंतर त्याचे गुजरातीतून इंग्रजी मध्ये भाषांतर केले, त्यांचा हा पहिलाच ग्रंथ होता.गांधीजींच्या राजकीय व सामाजिक विचारांची ध्येयदृष्टी समग्रतेने या ग्रंथात प्रकट झाली आहे. महात्मा गांधीनीहा ग्रंथ लिहित असताना एक वेगळा दृष्टीकोन लोकांसमोर ठेवलेला आहे. त्यांच्या मते तुम्हाला खऱ्या अर्थाने नवा भारत निर्माण करावयाचा असेल तर तो नवा भारत पाश्चात्य देशामध्ये असणारी जी राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था व सांस्कृतिक व्यवस्था आहे त्याची नक्कल करून नवे भारताची निर्मिती करता येणार नाही. तुम्हाला जी नवभारताची निर्मिती करावयाची आहे ती निर्मिती वेगळ्या दृष्टीकोनातून व भारतीय प्रतिभेला अनुकूल अशी करावयाची आहे. त्यामुळे समाजातील सर्व लोकांना न्याय मिळेल याबाबत मूलगामी असा प्रश्न गांधीजीनी हिंद –स्वराज्य या ग्रंथात उपस्थित केला आहे. हिंद स्वराज्याचे इंग्रजीमधील नाव 'इंडियन होम रूल' हे आहे. भारतामध्ये कशा प्रकारचे स्वराज्य स्थापन करावयाचे आहे या स्वराज्याची रुपरेषा कशा प्रकारची असली पाहिजे याचे विवेचन गांधीजीनी या पुस्तकामध्ये केले आहे.

## संशोधनाचे उद्देश

१) महात्मा गांधीच्या विचारांचा अभ्यास करणे.

२) महात्मा गांधीच्या 'हिंद स्वराज्य' विषयक विचार अभ्यासणे

३) महात्मा गांधीच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता अभ्यासणे.

## संशोधन पद्धती

महात्मा गांधीजींचे हिंद –स्वराज्य विषयक विचार' या शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध ग्रंथ, नियतकालिके, मासिके , वर्तमान पत्रातील लेख वेबसाईट यांचा अभ्यास करण्यात आला आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रा.डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील, शंकरराव जगताप आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली ता. कोरेगाव जि. सातारा*



**How to cite this article:**

*पाटील, . विक्रमराव . नारायणराव . (2025). महात्मा गांधीजीचे हिंद स्वराज्य विषयक विचार. Journal of Research and Development, 17(10), 168–170. https://doi.org/10.5281/zenodo.17646400*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.17646400

'हिंद स्वराज्य' चे स्वरूप संवादात्मक आहे. वाचक आणि संपादक यांच्या प्रश्नोत्तरातून गांधी आपली भूमिका स्पष्ट करतात. भारतातील हिंसेच्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या तरूण, ब्रिटीश राज्यकर्ते आणि भारतीय राष्ट्र या सर्वांना उद्देशून हे लिखाण केले असा आहे. 'श्यामजी कृष्ण वर्मा, वि.दा. सावरकर आणि गांधींच्या कामांना सढळ हातांनी मदत करणारे डॉ. प्राणजीवन मेहता यांच्या प्रश्नांना नजरेपुढे ठेवून गांधीनी 'हिंद स्वराज्य' लिहिले असेही म्हटले जाते.

अर्थात हिंसेचे समर्थन करणाऱ्यांना परावृत्त करणे हा जरी गांधीचा तात्कालिक उद्देश्य असता तरी गांधी विचारातील एकूण ध्येयदृष्टी समग्रतेने या ग्रंथात प्रकट होते ही वस्तुस्थिती आहे.१ गांधीनी हिंदस्वराज्याच्या पहिल्या प्रकरणामध्ये स्वराज्याची स्थापना करणे हे आपल्या सर्वांचे उद्दिष्टे आहे त्याची स्थापना भारतामध्ये झाली पाहिजे. स्वराज्याची स्थापना फक्त काँग्रेस पक्षाकडून होऊ शकत नाही. त्यासाठी आपण सर्वानी प्रयत्न केले पाहिजेत. भारत जरी स्वतंत्र झाला तरी भारतीयानी सामाजिक सुधारणा घडवून आणल्या नाहीत तर स्वतंत्र झालेला भारत पुन: पारतंत्र्यात जाईल. त्यामुळे आपण स्वत:साठी पात्र बनले पाहजे. आपल्यामध्ये सुधारणा घडवून आणली पाहिजे त्याची हि भूमिका महत्त्वाची होती.

भारतामध्ये कशा प्रकारचे स्वराज्य आणावयाचे आहे या स्वराज्याची रूपरेषा कशा प्रकारची असली पाहजे याचे विवेचन महात्मा गांधीनी या पुस्तकामध्ये केले आहे. 'गांधीना असा प्रश्न विचारला गेला की तुम्ही हि जी स्वातंत्र्याची चळवळ करीत आहात त्या स्वातंत्र्य चळवळीचा उद्देश काय आहे?' जी राज्यव्यवस्था आपण 'हिंद स्वराज्य' मध्ये रेखाटली आहे त्या स्वराज्य स्थापनेसाठी आपण सध्याची स्वातंत्र्य चळवळ करीत आहात का? तर गांधीजीनी सांगितले की, मी ज्या कॉंग्रेस पक्षाच्या राजकीय चळवळीचे नेतृत्व करीत आहे त्या चळवळीचा उद्देश भारतामध्ये संसदीय व्यवस्था स्थापन करणे हा आहे. त्या चळवळीचा उद्देश 'हिंद स्वराज्य' मधील स्वराज्य स्थापन करणे हा नाही पण तसे हिंद स्वराज्य भारतामध्ये स्थापन करणे ही माझी इच्छा आहे. २

इंग्रज हे आमच्या देशामध्ये आले त्यांनी आपले राज्य प्रस्थापित केले या कामात त्यांना आपल्याच लोकांनी मदत केली. इंग्लंड हा व्यापाऱ्यांचा देश आहे. जो पर्यंत त्यांचा फायदा आहे तो पर्यंत ते सगळ्या गोष्टी करतील, ज्या दिवशी त्यांचा फायदा संपला त्या दिवशी ते निघून जातील अमेरिकेवर राज्य करणे फायद्याच नाही म्हणून त्यांनी अमेरिका सोडून दिली. इंग्रजांना या देशातील संस्थानिक जमीनदार, जहागीरदार यांनी मदत केली. इंग्रजानी या लोकांना आमिष दिली यामुळे त्यांचे राज्य या देशावर वाढत गेले. इंग्रज राजवटीचा भारतीय समाजावर फार मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. इंग्रजानी या देशाची लुटमार केली . 'गांधी विचारतात की, इंग्रज राजवटीचे आपल्या देशावर काय परिणाम झाले? ते म्हणतात, "असा प्रश्न विचारल्या नंतर ते लिहितात, त्यांचे वर्णन करण्यासाठी माझ्या जवळ शब्द नाहीत. माझ्या डोळ्यातून सारखे पाणी येते, माझा कंठ सुकतो आणि माझा घसा कोरडा पडतो, इतके भयंकर परिणाम इंग्रजी राज्याचे या देशावर झालेले आहेत. या राजवटीमुळे मूठभर लोकांचा फायदा झाला असेल परंतु या देशात जो बहुसंख्य समाज आहे. त्या बहुसंख्य समाजावर या इंग्रज राजवटीने अतिशय वाईट परिणाम झाले. शेतकरी निराधार झाले, त्यांची शेती ओसाड झाली. दुष्काळ मोठ्या प्रमाणावर पडला. लाखो लोक दुष्काळा मध्ये मरण पावले. भारतातील जे उद्योग धंदे होते ते देशोधडीला लागले. कारागीर उपासमारीने मेले. जगाच्या इतिहासात कोणत्याही देशावर राज्य करत असताना अशा प्रकारचा अन्याय केलेला एवढा अन्याय इंग्रजानी या देशामध्ये केलेला आहे. इंग्रजांचे राज्य हे केवळ एका देशाचे दुसऱ्या देशावर स्थापन केलेले राज्य नसून एका उन्मत अशा आधुनिक संस्कृतीने दुसऱ्या एका अतिशय सभ्य अशा संस्कृतीवर केलेला हल्ला आहे, म्हणून त्यांना या देशाच्या संस्कृतीचा, इतिहासाचा, अर्थकारणाचा, देशाच्या शेतीचा आणि उद्योगधंद्याचा पूर्णतः नाश केलेला आहे.३ त्यामुळे त्यामुळे या देशाला पुनरुज्जीवित करण्यासाठी व नवभारताची उभारणी करण्यासाठी इंग्रजांचे राज्य व त्यांची संस्कृती उखडून टाकणे अत्यंत आवश्यक आहे. हिंद स्वराज्य या ग्रंथामध्ये गांधी म्हणतात की भारतावर ग्रीक, कुशाण, तुर्की, मंगोल, व अफगाण आले. त्यांनी हूण, कुशाण, तुर्की, मंगोल व अफगाण आले त्यांनी राज्य स्थापन केले. परन्तु भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्ये असे आहे की भारतीय संस्कृती, धर्म, भाषा, बंश, वर्ण यांचा वेगळेपणा लक्षात घेत नाही. आमच्या दृष्टीने हे लोक मनुष्य आहेत. ही महत्त्वाची गोष्ट आहे. धर्माच्या, जातीच्या वंशाच्या व वर्णाच्या नावाने लोकाना ओळखण्याची पद्धती ही इंग्रजाची आहे. जातीच्या, धर्माच्या व वंशाच्या नावाने भांडणे लावावयाची हे त्यांचे धोरण होते ते धोरण त्यांनी भारतावर लादले. भारतीय संस्कृती कोणालाही नाकरत नाही. जे भारतात आले ते सगळे भारतीय संस्कृतीचा एक भाग बनले एखाद्याला जुलूम करून त्याला भारतीय संस्कृती स्वीकारण्यास लावली नाही.

गांधीजींच्या मते, भारत स्वतंत्र भारतीय राज्यकर्त्याच्या हाती दिले तर ते लोकाना न्याय देतील असे लोकाना ठामपणे सांगता येत नाही. ते जर जुलूम करत असतील तर त्यांच्या विरुद्ध संघर्ष केला पाहिजे. तुम्ही ज्या प्रकारच्या साधनांचा वापर कराल त्या प्रकारचे साध्या तुम्हाला प्राप्त होईल. तुमची साधन जेवढी चांगली असतील जेवढी शुद्ध असतील तेवढ्या मोठ्या प्रमाणात तुमची जी साध्ये आहेत ती साध्ये शुद्ध असणार आहेत. गांधीजींच्या दृष्टीने संघर्षातून संघर्ष वाढतो. द्वेषामुळे द्वेष वाढतो. सुडातुन सूडभावना वाढते आणि प्रश्न सुटत नाही. म्हणून साधनांची शुद्धता अत्यंत महत्त्वाची आहे. असा विचार त्यांनी मांडला. महात्मा गांधी शांततेचे पुरस्कर्ते होतो. म्हणून अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याबाबत त्यांचा विरोध नव्हता. अन्याय शांतपणे सहन करा असे गांधीनी कधीही सांगितले नाही. परंतु त्यांचे मते अन्यायाविरुद्ध संघर्ष सुरु करण्यापूर्वी सर्व सनदशीर उपाय तुम्ही अवलंबून बघा. संघर्ष करण्यासाठी गांधीने आत्मबळाचा अवलंब करण्यास सांगितले आहे. आत्मबल प्राप्त करण्यासाठीची प्रथम आपणा स्वत: स्वतंत्र असले पहिजे. आपण स्वत: स्वतंत्र बुद्धीने कामा करणारे आहोत आणि आपल्या सदसदविवेक बुद्धीच्या आधारावर काम केले पाहिजे. जे चुकीचे कायदे आहते ते पाळणार नाही. ते कायदे पाळीत नाही म्हणून जी काही शिक्षा आपणास भोगावी लागेल ती शिक्षा आनंदाने भोगली पाहिजे. सत्याच्या आग्रहासाठी, सत्याच्या प्रतिष्ठेसाठी आणि अन्यायाच्या विरुद्ध संघर्ष करायासाठी यातना सहन करण्याची तयारी असली पाहिजे यातूनच आत्मबळ प्राप्त होईल.

**निष्कर्ष**

हिंद स्वराज्य विषयक विचार मांडताना महात्म्य गांधीने नवभारताच्या उभारणीसाठी भारतीयांनी कोणते विचार आत्मसात केले पाहिजे या विषयी विचार मांडले आहेत. इंग्रजांनी भारतावर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार केले. परंतु त्यांची संस्कृती भारतीयावर लादण्याचा प्रयत्न केला. भारतीयांनी इंग्रजाची संस्कृती आत्मसात करू नये. भारताच्या संस्कृतीचे जे दोष आहेत. ते दूर केल पाहिजेत. प्रत्येक माणसाच्या स्वातंत्र्याच्या स्वयंनिर्णयाच्या व आत्मबळाच्या आधारावर आपणास नवा समाज उभा करावयाचा आहे. इंग्रजांनी भारतातील शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात शोषण केले. त्यासाठी त्याच्या विरुद्ध शांततेच्या, अहिंसेच्या मार्गाने प्रतिकार केला पाहिजे. हिंसेच्या मार्गाने जर आपण प्रतिकार केला तर त्यातून जे स्वतंत्र मिळेल त्यातून भारतीय लोकांची हुकुमशाही प्रवृत्तीची मानसिकता तयार होईल. भारतीयच भारतीयांचे शोषण करतील त्यामुळे अहिंसेच्या मार्गाने भारतीयांना न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, समता ही तत्वे आत्मसात होतील. भारतात लोकशाही चिरकाल टिकेल याबातीत ते शेजारील राष्ट्रांचे उदाहरण देतात. त्या देशांनी हिंसेच्या मार्गाने स्वतंत्र्य मिळवले त्या देशात अशांतता निर्माण झाल्या आहेत. आपल्या देशातील राज्यकर्ते अन्याय अत्याचार करीत असतील. तर त्यांच्या विरुद्ध संघर्ष केला पाहिजे आणि त्यासाठी साधने शुद्ध असली पाहिजेत तरच तुमच्यामध्ये आत्मबळ निर्माण होईल जो अन्याय करीत आहे त्यांच्या विषयी द्वेष बाळगू नये. त्याला सत्याग्रहाच्या मार्गाने उत्तर द्यावे असा विचार गांधीजी मांडतात. हिंद स्वराज्य विषयक विचार मांडताना गांधीजी लोकशाही शासनपद्धतीकडे पाहण्याची पर्यायी दृष्टी देतात. स्वराज्य राष्ट्र, सभ्यता, आधुनिक न्यायव्यवस्था आरोग्य, शिक्षण विकास आणि बळ या आणि अशा संकल्पनांना गांधी पर्यायी अर्थ देतात. भारतीयांना आपला भूतकाळ, आपले वर्तमान वास्तव आणि आपले आदर्श याकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन देतात.

भारतामध्ये आजही लोकशाही टिकून आहे त्यामध्ये भारतीय लोकांच्यावर गांधी विचारांचा प्रभाव आढळतो. गांधीने अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सत्य, अहिंसा, उपोषण, बंद, बहिष्कार, सत्याग्रहाचे अनेक मार्ग भारतीयांच्या पुढे ठेवले आहेत त्यातूनच भारतीयांचे अनेक प्रश्न सोडवण्यास मदत होते त्यामुळे जगामध्ये गांधी विचारांचे महत्त्व लक्षात येते.

**संदर्भ**

१) रेडकर चैत्रा – गांधी विषयी गांधी : जीवन आणि कार्य खंड -१ ‘हिंद –स्वराज्य: समाजसापेक्ष’ विकासाच्या प्रतिमाणाचा आराखडा. किशोर बेडकिहाळ (संपा.) साधना प्रकाशन, पुणे ३० जानेवारी २०२२ पृ. क्र. ३२३.

२) चौसाळकर अशोक – गांधी विषयी गांधी – जीवन आणि कार्य, खंड -१ हिंद स्वराज्य आणि आत्मबळाची प्राप्ती, कोशोर बेडकिहाळ (संपा.) साधना प्रकाशन, पुणे ३० जानेवारी २०२२ पृ. क्र. २९७

३) उपरोक्त – पृ. क्र. ३०४

**संदर्भ ग्रंथ**

१) किशोर बेडकिहाळ- गांधी विषयी गांधी : जीवन आणि कार्य खंड -१ साधना प्रकाशन, पुणे ३० जानेवारी २०२२

२) चौसाळकर अशोक – गांधी विषयी गांधी विचार आणि समकालीन विचारविश्व खंड २ साधना प्रकाशन, पुणे ३० जानेवारी २०२२

३) ओझा रमेश – गांधीविषयी गांधी : खुर्द आणि बुद्रुक, खंड – ३, साधना प्रकाशन, पुणे, ३० जानेवारी २०२२

४) फक्रुद्दीन बेन्नूर – म.गांधी प्रणित इतिहास शास्त्र आणि हिंद स्वराज : अन्वयार्थ प्रकाशक महात्मा गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५) भोळे भा.ल. – आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे आणि कंपनी, पब्लिशर्स, नागपूर,

६) चक्रवर्ती विद्युत, पांडे राजेंद(अनुवाद चित्रा लेले), - आधुनिक भारतीय राजकीय विचार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.